दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २०४ वा रविवार दि.०२ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## देशाला खेळणी क्षेत्रात ग्लोबल हब बनविणार

नवी दिल्ली : अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज संसदेत अर्थसंकल्प २०२५ मांडला. यावेळी त्यांनी तरुणांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने अनेक घोषणा केल्या. त्यातीलच एक महत्त्वाची घोषणा म्हणजे देशात आता मेड इन इंडिया खेळणी मिळणार आहेत. खेळण्यांच्या क्षेत्रात राष्ट्रीय योजना आणणार, अशी घोषणा अर्थमंत्री सीतारमण यांनी केली आहे.संसदेत अर्थसंकल्प मांडताना निर्मला सीतारमण यांनी महत्त्वाच्या घोषणा केल्या आहेत. यावेळी त्यांनी स्टार्टअपसाठी १० हजार कोटींचे फंड उभारण्याची घोषणा केली आहे. तसेच, टॉय सेक्टर म्हणजेच खेळण्याच्या क्षेत्रासाठी भारत ग्लोबल हब बनवण्यात येईल. हे खेळणे मेक इन इंडियाच्या नावाने विक्री केले जातील. खेळण्याच्या क्षेत्रासाठी एख योजना कार्यान्वित करण्यात येईल. या योजनेंतर्गत क्लस्टर रुम, पॉश लूम असे निर्माण करुन इको सिस्टमवर अधिक भर देण्यात येईल. जेणेकरुन याच्या निर्मितीमुळं चांगल्या गुणवत्तेचे, अनोखे आणि पर्यावरण पुरक असे खेळणी बनवण्यात येतील. हे खेळणी मेक इन इंडिया ब्रँडचे प्रतिनिधित्व करतील, असे निर्मला सीतारमण यांनी म्हटले आहे.

निर्मला सीतारमण यांच्या महत्त्वाच्या घोषणा

– स्टार्ट अप्ससासाठी १० कोटीवरुन २० कोटींची क्रेडीट लिमिट – चामड्याची पादत्राणे बनवण्यांसाठी विशेष योजना – भारताला खेळण्यांचा क्षेत्रात ग्लोबल हब बनविणार – पूर्वोत्तर राज्यांत अन्न प्रक्रिया उद्योगाला चालना देणार – वैज्ञानिक संशोधनाला चालणा देण्यासाठी वर्षांचा कार्यक्रम – भारतीय भाषांमधील पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणार

## लातूर तालुक्यातील ग्रामीण विकासाला चालना माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते आमदार स्थानिक विकास निधीतून पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पन

लातूर / प्रतिनिधी :– लातूर शहरातील विधानसभा मतदारसंघातील महाराणाप्रतापनगर, वरवंटी, बसवंतपूर आणि खाडगाव या गावांमध्ये आमदार स्थानिक विकास निधीतून विविध विकास कामे पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांचे लोकार्पन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले. लातूर शहरानजीक असलेल्या या गावात शहराप्रमाणे सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा पुरविण्यात येतील, कंत्राटदराने कामे दर्जे दार करावीत याची दक्षता घ्यावी, निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही अशी ग्वाहीही याप्रसंगी बोलताना त्यांनी दिली. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून महाराणाप्रतापननगर येथे रहीम नगर येथील श्री कंजे सर यांच्या घरापासून ते श्री शरद शिंदे यांच्या घरापर्यंत तसेच संगिता गायकवाड यांच्या घरापासून ते श्री गुंडेराव पाटील यांच्या घरापर्यंतचा सिमेंट काँक्रीट रस्त्यासह विविध विकासकामे पूर्ण झाली त्या ठिकाणी जाऊन ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत त्याचे लोकार्पण केले. यावेळी ग्रामस्थांसोबत चर्चा केली, त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या, सर्व समस्या सोडवण्याची ग्वाही त्यांनी दिली. लातूर शहर मतदार संघातील वरवंटी बसवंतपूर गावांना वरवंटी येथे आमदार स्थानिक विकास निधीतून नांदगाव रोड ते शिवाबदनाळे यांच्या घरापर्यंत बांधण्यात आलेल्या रस्त्याचे लोकार्पण केले तर नांदगाव रोड ते रणजीत भारती यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे भूमिपूजन केले, गावातील विविध विकास कामांची पाहणी केली. वरवंटी बसवंतपूर या दोन्ही गावात ग्रामस्थांशी संवाद साधला. ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्या समवेत चर्चा केली. तेथील अडीअडचणी समजून घेतल्या, त्या



सर्व अडचणी सोडवण्यात येतील असे आश्वासन दिले. यानंतर खाडगाव येथे आमदार स्थानिक विकास निधीतून श्री. नानासाहेब साळुंखे यांच्या घरापासून ते श्री अनिल साळुंखे यांच्या घरापर्यंत बांधण्यात आलेल्या काँक्रीट रस्त्याचे आणि नाली बांधकामाचे लोकार्पण केले. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ, महिला भगिनी यांच्याशी संवाद साधला. गावातील अडीअडचणी तसेच आगामी काळात राबवायाच्या विकास योजना संदर्भात चर्चा केली, लातूर आणि खाडगाव आता वेगळे राहिले नाही त्यामुळे या गावातील नागरिकांना शहराप्रमाणे सर्व प्रकारच्या मूलभूत सोयी सुविधा पुरवण्यासाठी आपण बांधील असल्याची ग्वाही याप्रसंगी बोलताना दिली. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, लातूर जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता क्षितिज खरोळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तर महाराणा प्रताप नगर येथे सरपंच संगीता पतंगे, राजकुमार पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष जाधव, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, विजय पतंगे, एम.के इनामदार, तुकाराम आडे, नरेंद्र काळे, श्रीराम आडे, एन.ए.इनामदार, युसूफ शेख, सतीश मस्के, अनिल जोशी, उस्मान देशमुख, श्रीमंत सरवदे आदीसह महाराणा प्रताप नगर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. वरवंटी येथे सरपंच पवन जाधव, उपसरपंच राजु पाटील, ग्रामपंचायत अधिकारी अरविंद जगताप, सत्तार शेख,मुक्तार शेख, जिल्हा परिषदेचे शाखा अभियंता पी.पी.पाटील, दुष्यत वाघमारे, ओमकार माने, अशोकराव लामदाडे, आर.डी कुमरे, धनराज पाटील, अंकुश जाधव, नामदेव बनसोडे, विलास रसाळ, रामचंद्र राठोड, लिंबराज जाधव, संतोष जाधव, अतुल जाधव, आदीसह वरवंटी बसवंतपुर येथील ग्रामस्थ उपस्थित होते. तर खाडगाव येथे सरपंच नेताजी देशमुख उपसरपंच अभिनंदन जाधव, ग्राम विकास अधिकारी उत्तम गोमसाळे,तलाठी तावशेकर देवानंद जाधव,बशीर शेख चंद्रकांत साळुंके सर हनमंत देशमुख जब्बार सय्यद शरद देशमुख युवराज जाधव संतोष देशमुख रवींद्र काळे विजय देशमुख सुभाष घोडके दौलत देशमुख गौस सय्यद सार्वजनिक बांधकाम विभाग इंजिनियर आप्पासाहेब वाघमारे गोविंद डूरे पाटील आदी उपस्थित होते.

## शेतकऱ्यासह मध्यमवर्गीयांना दिलासा देणारा मोदीसरकारचा अर्थसंकल्प जाहीर–आ. कराड

लातूर :– कृषी क्षेत्राला आत्मनिर्भर्तेकडे घेऊन जाण्यावर भर दिला असून क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाखाहून पाच लाखापर्यंत करण्याची घोषणा करून शेतकऱ्यांना त्याचबरोबर बारा लाखापर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करून मध्यमवर्गीयासह नोकरदारांना दिलासा देणारा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारचा अर्थसंकल्प जाहीर झाला असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी आज शनिवारी संसदेच्या सभागृहात सादर केला यावर्षीच्या अर्थसंकल्पात त्यांनी शेती, उत्पादन, रोजगार, सूक्ष्म मध्यम आणि लघुउद्योग, ग्रामीण भागाचा विकास आणि संशोधन या दहा विशेष क्षेत्रावर भर दिला आहे.

कृषी क्षेत्र आत्मनिर्भर तिकडे घेऊन जाण्यासाठी पंतप्रधान धन्य कृषी योजनेचा देशभरातील १०० जिल्ह्यात १ कोटी ७० लक्ष शेतकऱ्यांना लाभ दिला जाणार आहे किसान क्रेडिट कार्ड वरील कर्जाची मर्यादा तीन लाखावरून पाच लाख करण्यात येत असल्याची घोषणा करून अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी तूर, उडीद, मसूर या डाळीच्या पिकांबरोबरच कापूस उत्पन्न वाढीसाठी आणि भाजीपाला व फळाचे विशेष उत्पादन वाढविण्यासाठी व किफायतशीर दर देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे बोलून दाखविले. शेतकऱ्यांसाठी हा दिलासा देणारा निर्णय आहे.



नवीन कर प्रणालीत फेरबदल करून १२ लाखापर्यंतचे वार्षिक उत्पन्न कर मुक्त करण्याचा निर्णय जाहीर करून मध्यमवर्गीयासह नोकरदारांना मोठा दिलासा दिला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गोरगरिबांच्या हितासाठी अनेक योजना जाहीर केल्या वेगवेगळ्या क्षेत्रासाठी भरीव तरतूद केली, शिक्षण क्षेत्राला महत्त्व देऊन पुढील पाच वर्षात वैद्यकीय महाविद्यालयातील ७५ हजार जागा वाढवण्याचे घोषित केले. कर्करोग आजाराच्या रुग्णांसाठी दिलासा देऊन ३६ जीवनावश्यक औषधांना करातून सूट जाहीर केली.

महिलांना उद्योग वाढीसाठी प्रशिक्षण, मार्केटिंग आणि सरकारी योजनाशी जोडण्याची संधी दिली जाणार असून एससी आणि एसटीच्या पाच लाख नव्या महिला उद्योजकांसाठी दोन कोटी रुपये मुदतीचे कर्ज मिळणार आहे. एकूणच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी देशहित आणि देशातील सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून अर्थसंकल्प जाहीर केला खऱ्या अर्थाने सर्व क्षेत्राला निश्चितपणे दिलासा मिळणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

## महागाईने बेजार सामान्य जनता, बेजार बेरोजगार युवक आणि कष्टकरी शेतकऱ्यांचा भ्रमनिराश करणारा केंद्रीय अर्थसंकल्प- माजी मंत्री अमित देशमुख

लातूर / प्रतिनिधी :– उद्योग वाढीला चालना नाही, शेती उत्पादन, आणि शेतीमालाचे भाव वाढवून देण्यासाठी कोणतेही नियोजन नाही, महागाई कमी करण्यासाठीही कोणत्याही उपायोजना नसलेला अर्थसंकल्प आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी लोकसभेत सादर केला, त्यामुळे सामान्य नागरिक, शेतकरी, रोजगाराच्या प्रतीक्षेत असलेले युवक या सर्वांनची केंद्र सरकारने घोर निराशा केली आहे, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान, देशातील सर्वसामान्य जनतेसाठी भरघोस आश्वासने देऊन सत्तेवर आलेल्या केंद्र सरकारने या जनतेचा आता विश्वासघात केला असल्याचे आमदार अमित देशमुख यांनी या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले आहे. देशातील मुठभर उद्योगपतींच्या हितांचे रक्षण करणारे सरकार अशी अगोदरपासूनच या सरकारची प्रतिमा आहे, या अर्थसंकल्पानंतर ती प्रतिमा आणखीन गडद झाली आहे. नोकरदार वर्गासाठी आयकर स्लॅब मध्ये काही प्रमाणात सूट दिल्याचे केंद्रीय अर्थमंत्र्यांनी दाखवले असले तरी जीएसटी आणि इतर टॅक्स मधून या वर्गाच्या खिशातून अधिकचे पैसे काढून घेण्याचे नियोजन पूर्वीच केलेले आहे. मागच्या दहा वर्षापासून सरकारच्या आयात धोरणाचा देशातील गहू, भात, डाळी, सोयाबीन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना



फटका बसतो आहे, याची माहिती असूनही, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी व्हावा, त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी, किंवा त्यांच्या कर्जमाफीसाठी कोणतीही ठोस उपाययोजना या सरकारने केलेली नाही. रोजगार वाढीचे आश्वासन दिले गेले असले तरी मागच्या आश्वासनाचे काय झाले याचा ताळेबंद दिलेला नाही, शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्राकडे अर्थसंकल्पात पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आले असून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठीही फारसे काही केल्याचे दिसून येत नाही, देशात सर्वाधिक टॅक्स जमा करून देणाऱ्या महाराष्ट्र राज्याबाबत पुन्हा या अर्थसंकल्पात दुजाभाव दिसून आला आहे. ज्या राज्यात निवडणूक त्या राज्यासाठी अधिक घोषणा हे सूत्र पुन्हा या अर्थसंकल्पात दिसून आले आहे, बिहार राज्यात आगामी काळात निवडणुका होणार असल्यामुळे हा अर्थसंकल्प केंद्र शासनाचा आहे की, बिहार राज्याचा अशी शंका यावी इतपत या राज्यासाठी, मखाना बोर्ड, ग्रीन फिल्ड विमानतळ, आयआयटीचा विस्तार यासारख्या घोषणा केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत. एकंदरीत देशातील महागाईने होरपळत असलेला सामान्य माणूस, बेकारीने गांजलेला युवक वर्ग आणि शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून कर्जाच्या ओजाखाली दबणारा शेतकरीवर्ग या सर्व घटकांचा केंद्रीय अर्थसंकल्पातून भ्रमनिरास झाला आहे असेही आमदार अमित देशमुख यांनी शेवटी म्हटले आहे

## शेती आणि शेतकऱ्यांसाठी नव्या संधी निर्माण करणारा अर्थसंकल्प – आ.संभाजी पाटील निलंगेकर

निलंगा /प्रतिनिधी: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केलेल्या अर्थसंकल्पातून शेती आणि शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योजक, व्यावसायिक,तरुण अशा प्रत्येक घटकासाठी या अर्थसंकल्पाने काही ना काही दिले आहे,अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली.



आ. निलंगेकर म्हणाले की, देशातील १०० जिल्ह्यांसाठी विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात आली आहे. तेलबिया उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण आखण्यात आले असून १०० टक्के माल खरेदी केली जाणार आहे.यातून शेतकऱ्यांना सुविधा मिळणार आहेत. या अर्थसंकल्पामुळे कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढणार असून असंख्य नव्या संधी निर्माण होणार असल्याचे ते म्हणाले.

मच्छीमारांना ५ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज,युवा उद्योजकांसाठी कर्ज मर्यादा आणि वारंवारतेचा निकष वाढविणे हे महत्त्वपूर्ण निर्णय आहेत. स्टार्टअपसाठी कर्ज मर्यादा २० कोटी रुपयांची करण्यात आली असून पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी राज्यांना ५० वर्ष बिनव्याजी कर्ज योजनेचाही फायदा होणार आहे.

देशाला पुढे घेऊन जाणारा, सर्व समाजघटकांचा विचार करणारा हा अर्थसंकल्प आहे.यावर्षीच्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न करमुक्त करून सरकारने सामान्यांना दिलासा दिला आहे. मध्यमवर्गीय, पगारदार,कष्टकरी यांच्याबाबत आखलेल्या धोरणामुळे सामान्यांच्या विकासाला गती येणार असल्याची प्रतिक्रियाही आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केली.

## 'सब का विकास' धोरणाला फाटा देणारा अर्थसंकल्प – माजी आमदार धिरज देशमुख

सब का साथ सब का विकास, हे सरकारचे धोरण आहे. पण प्रत्यक्षात सरकार सर्वांच्या विकासावर बोलत नाही. आजचा अर्थसंकल्पही त्याच पद्धतीचा होता. मुठभरांचाच विकास साधण्यावर सरकारचा कायम भर राहिला आहे. त्यामुळे महागाई कमी होताना दिसत नाही. पेट्रोल डिझेलचे दर गगनाला भिडले आहेत. घरगुती गॅसचे भाव वाढतच आहेत. सर्वसामान्यांचे जगणे अवघड होत आहे. याकडे सरकारचे लक्ष नाही. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर करू, अशी घोषणा भाजपाने केली होती. अद्याप ही घोषणा पूर्ण केली नाही. महागाईला आळा घालण्यात सरकार अपयशी ठरत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांसाठी यंदाचा अर्थसंकल्प निराशादायक, अपेक्षाभंग करणारा असाच आहे.



– धिरज विलासराव देशमुख

माजी आमदार तथा सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

## उत्पन्नच नसेल तर त्या करमाफीच काय करावं ? खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया

धाराशिव :– बारा लाखापर्यंत उत्पन्न असणाऱ्याना आता करातून सूट मिळण्याची घोषणा करणाऱ्या सरकारने उत्पन्न वाढविण्यासाठी काय केल? उत्पन्नच नसेल त्यांनी करमाफीच काय करायच असा सवाल खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी उपस्थित केला. शेतकऱ्यांना समोर ठेवून कधीतरी धोरण ठरविणार आहात की नाही ? असाही प्रश्न ओमराजे यांनी मोदी सरकारला केला आहे.

खा. ओमराजे म्हणाले की, या सरकारचे आतापर्यंतचे सर्व अर्थसंकल्प हे आकड्याचे खेळ व घोषणाचा पाऊस एवढ्यापुरते मर्यादित आहेत. शेतकऱ्यांच उत्पन्न दुप्पट करु म्हणणार हे सरकार आता त्याविषयी एक चकार शब्द काढत नाही, शेतकऱ्यांना वीज, पाणी व हमीभाव या तीन गोष्टी आवश्यक असतात. धोरण करताना या तीनही बाबीत कमालीचा निरुत्साह दिसतो. असा धोरण लखवा असल्यावर त्या शेतकऱ्यांच उत्पन्न कस वाढणार ? शिवाय आता डाळीच्या उत्पादन वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असं म्हणतंय पण पुन्हा मूळ मुद्दा येतो हमीभावाचा त्यावर अर्थमंत्री शब्दही काढत नाहीत.



सध्या शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, तो अडचणीत आहे हे माहित असतानाही थोडीतरी संवेदनशिलता या सरकारने दाखवायला हवी होती. उद्योगपतीच लाखो कोटीच कर्ज माफ होत पण आमच्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना लाखाची कर्जमाफी मिळत नाही हे दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांच जगणं हे सरकार कधीच मान्य करेल असं मला वाटत नाही अशी खंत ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली. आजही आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचं लक्ष साडेसहा टक्केच्या पुढे जात नाही, ही आकडेवारी कोविड काळानंतरची सर्वात कमी आहे. यावरून या सरकारच धोरण व वास्तव परिस्थिती यामध्ये मोठं अंतर असल्याच अधोरेखित होत असल्याची प्रतिक्रीया खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिली आहे.

## संपादकीय....

# अर्थव्यवस्थेला गती देण्याची सुवर्णसंधी

मोदी सरकारच्या ऐतिहासिक तिसर्या कार्यकाळातील आगामी अर्थसंकल्प हा पहिला पूर्ण अर्थसंकल्प असल्याने सर्वसमावेशक विकास, रोजगारनिर्मिती आणि दीर्घकालीन स्थैर्य यावर भर देताना तत्काळ समस्यांवर उपाय शोधणे अत्यावश्यक आहे. आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन केंद्रीय अर्थसंकल्प सादर करत आहेत, त्यानिमित्ताने...

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ हा महागाई, बेरोजगारी आणि मंदीने ग्रासलेल्या जागतिक परिस्थितीत भारताच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याची सुवर्णसंधी आहे. अनेक देश युद्धजन्य परिस्थिती आणि दहशतवादी कारवायांमुळे आर्थिकदृष्ट्या पंगू झाले आहेत. या अर्थसंकल्पाद्वारे भारताच्या आर्थिक स्थैर्याला बळकटी देणार्या बदलांचे आश्वासन आहे. भारत स्थैर्याचा दीपस्तंभ म्हणून उभा असल्याने या अर्थसंकल्पात महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. घरगुती मागणी वाढवणे, जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताला उत्पादन व नावीन्याचे केंद्र बनवण्यासाठी हा अर्थसंकल्प हे एक व्यासपीठ आहे. अर्थसंकल्प फक्त तत्कालिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नसून भारताच्या आर्थिक नेतृत्वासाठी पुढील अनेक दशकांचे दूरदर्शी राजमार्ग आखणे आवश्यक आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या आर्थिक धोरणांचा आरसा असतो. यात वापरण्यात येणार्या तांत्रिक संज्ञा आणि शब्दावली सामान्य नागरिकांसाठी कधी कधी गुंतागुंतीच्या वाटू शकतात. अर्थसंकल्प समजण्यासाठी आणि त्याचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम ओळखण्यासाठी या संज्ञांची योग्य ओळख होणे आवश्यक आहे. यातील सर्वांत महत्त्वाचा शब्द असतो तो जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पन्न. याचा अर्थ विशिष्ट कालावधीत देशात उत्पादित सर्व वस्तू आणि सेवांची एकूण आर्थिक किंमत. जीएनपी म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादन, ज्यामध्ये परदेशातून मिळणारे निव्वळ उत्पन्न समाविष्ट असते. फिस्कल डेफिसिट म्हणजे राजकोषीय तूट म्हणजे सरकारच्या एकूण खर्च आणि उत्पन्न यातील तूट (उधारी वगळून). सरकारी महसुलाने नियमित खर्च भागविण्यात येणारी कमतरता म्हणजे महसूल तूट अर्थात रेव्हेन्यू डेफिसिट. देशाच्या आयातीचा खर्च निर्यातीतून मिळणार्या उत्पन्नापेक्षा अधिक असतो तेव्हा निर्माण होणार्या तुटीला चालू खाते तूट म्हणजेच करंट अकाऊंट डेफिसिट म्हणतात. यासह अन्य शब्दावली सर्वसामान्यांनी समजून घेतल्या पाहिजेत, जेणेकरून आपल्या देशाचा अर्थसंकल्प नेमका कसा आहे, याचे आकलन होण्यास मदत होऊ शकते.

पायाभूत सुविधा विकास

पायाभूत सुविधा भारताच्या विकासकहाणीचा कणा आहेत. वाहतूक जाळे, लॉजिस्टिक हब आणि डिजिटल पायाभूत सुविधा यामध्ये गुंतवणूक केल्यास रोजगार निर्माण होईल आणि भारत जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षण ठरेल. बंदरे आणि विमानतळ मानव आणि साहित्य यांच्या जलद व कार्यक्षम वाहतुकीसाठी विकसित होणे आवश्यक आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि पायाभूत सुविधांच्या बाँडवर कर सवलतींद्वारे अतिरिक्त संसाधने उपलब्ध होऊ शकतात.

रोजगारनिर्मिती आणि कौशल्य विकास

बेरोजगारीला हाताळणे महत्त्वाचे आहे. हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि रोबोटिक्स यासारख्या भविष्यकालीन क्षेत्रांमध्ये कौशल्य विकासासाठी निधी प्रदान केल्याने श्रमिकवर्ग उद्योगांच्या बदलत्या गरजांसाठी तयार होईल. उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील मजूरकेंद्रित प्रोत्साहनांद्वारे रोजगार निर्माण होऊ शकेल. पायाभूत सुविधा प्रकल्प श्रमप्रधान असतात आणि त्याद्वारे मालमत्ता तयार होत असताना भविष्यातील प्रगतीसाठी वाट मोकळी होते.

कर सुधारणा : विकासासाठी आधार

आर्थिक सुधारणा केंद्रस्थानी असताना कर सुधारणा पूरक भूमिका बजावतील. जीएसटी आणि आयकर प्रक्रियांची गुंतागुंत कमी करणे, ज्यामुळे अनुपालनाचा बोजा कमी होईल आणि करदात्यांचा आत्मविश्वास वाढेल. कलम ८० सी आणि ८० डीअंतर्गत वजावट वाढवून मध्यमवर्गीयांना दिलासा देणे, ज्यामुळे त्यांच्याकडे अधिक खर्च करण्यायोग्य उत्पन्न शिल्लक राहील. स्टार्टअप्स, एमएसएमई आणि हरित ऊर्जा प्रकल्पांसाठी लक्ष्यित कर प्रोत्साहने प्रदान करणे, जे नावीन्य व शाश्वततेला चालना देतील. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ भारतासाठी जागतिक आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येण्यासाठी एक सुवर्णसंधी आहे.

शेती आणि ग्रामीण विकास

ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी उद्दिष्टपूर्ण उपाययोजना गरजेच्या आहेत. सिंचनासाठी अनुदाने वाढवणे, कृषी तंत्रज्ञान स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे आणि शेतकर्यांना बाजारपेठेपर्यंत सहज पोहोचता येणे यामुळे कृषी उत्पादन क्षमता व ग्रामीण उत्पन्न वाढेल. कृषी व्यवसाय आणि साठवण सुविधा यांना कर सवलती दिल्यास गती मिळेल.

हरित ऊर्जा आणि शाश्वतता

जग पुनर्नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल करत असताना भारताने आघाडी घेणे आवश्यक आहे. सौर, वारा आणि हायड्रोजन ऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिल्यास देशाच्या ऊर्जेची गरज भागेल आणि शाश्वततेच्या दिशेने भारताचे नेतृत्व सिद्ध होईल. कार्बन क्रेडिट कमावण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न आणि जनजागृती केली पाहिजे.

महागाईवर नियंत्रण आणि मागणी वाढवणे

महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि ग्राहक मागणी वाढवण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. आवश्यक वस्तूंवरील दर कमी करणे आणि गरजू घटकांसाठी उद्दिष्ट अनुदान प्रदान केल्याने किंमती स्थिर होतील. थेट कर सवलतींद्वारे ग्राहकांच्या खरेदी क्षमतेला चालना दिल्यास आर्थिक क्रियाशीलता वाढू शकेल.

# मातीतलं करिअर: कृषी अन्नतंत्रज्ञान क्षेत्र

कृषी क्षेत्रामध्ये उत्पादन करण्याची क्षमता गेल्या चार दशकांत तीन पट वाढली. त्यामुळे आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालो. पण अन्नधान्य प्रक्रिया व साठवण यामध्ये मागे पडलो. जागतिक बाजारपेठेत प्रक्रिया उद्योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून आपण 'कृषी अन्न प्रक्रिया' यामध्ये आज नोकरीच्या संधी कशा आहेत पाहूया.

आपल्या भारतामध्ये अन्न हे पूर्णब्रह्म आहे असे म्हटले जाते. पण आज आपण जे खातो त्यातील ७० अन्न हे दूषित आहे. म्हणून शुद्ध अन्न मिळवण्याची आपणास खूप गरज आहे. जागतिकीकरणामुळे जगातील सर्व देशांमध्ये महासत्तेसाठी स्पर्धा सुरू आहे. भारताला या स्पर्धेमध्ये अव्वल स्थान मिळवायचे असेल, तर अर्थव्यवस्था मजबूत करणे गरजेचे ठरणार आहे आणि त्यामध्ये कृषी क्षेत्राचा वाटा खूप महत्त्वाचा ठरत आहे. मागील दोन वर्षांत करोनानंतरच्या टाळेबंदीतही भारतीय अर्थव्यवस्थेला अर्थसंजीवनी केवळ कृषी क्षेत्राच्या योगदानामुळे प्राप्त झाली आहे.



कृषी उत्पादन मुबलक, पण नाशवंत

जगात खाद्यापदार्थाच्या उत्पादनात भारताचा तिसरा क्रमांक लागतो. देशात दरवर्षी ६२५ दशलक्ष टनाहून अधिक खाद्यापदार्थांचे किंवा पिकांचे उत्पादन होते. डाळी, चहा, मसाले व दूध उत्पादनात भारत जगात प्रथम स्थानावर आहे. फळे व भाजीपाला उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. तृणधान्ये, तेलबिया व कुक्कुटपालनात पाचवा क्रमांक आणि मत्स्य उत्पादनात सातवा क्रमांक लागतो. कृषी शिक्षणातील आधुनिक तंत्रज्ञानामुळे नवनवीन पिकांचे अधिक व उत्कृष्ट प्रतीचे उत्पन्न देणारे वाण आधुनिक सिंचन पद्धती, संरक्षित शेती म्हणजे पॉलिहाऊस, ग्रीन हाऊस व शेडनेट मधील शेती यांत्रिक शेती असे विविध पर्याय उपलब्ध झालेले आहेत. या पुढील काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावर वाढत्या लोकसंख्येचा विचार करता कृषी उत्पादनाची क्षमता वाढवणे हे आधुनिक तंत्रज्ञानामुळे सहज शक्य होईल, असे अपेक्षित आहे. परंतु सर्व प्रकारचे कृषी उत्पादन हे नाशवंत आहे.

शेतीमाल प्रक्रिया

एका विशिष्ट कालावधीपर्यंत त्याची हाताळणी व साठवणूक शक्य आहे. शेतीमाल प्रक्रिया हे म्हणजेच अन्नप्रक्रिया सध्याच्या आर्थिक गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरू शकतो. कारण शेतीमालावरील प्रक्रिया, साठवणूक, अत्याधुनिक वेष्टन (पॅकेजिंग) यामुळे कृषी उत्पादने व त्यापासून तयार केलेले पदार्थ यांची साठवणूक व वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज पूर्ण करणे शक्य होईल. अमेरिका युरोप खंडातील पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारतामध्ये कृषी प्रक्रियेचे प्रमाण केवळ ६ आहे. म्हणून येत्या काही वर्षांमध्ये अन्नप्रक्रिया उद्योग व त्याकरिता लागणारे मनुष्यबळ व अन्न तंत्रज्ञ (फूड टेक्नॉलॉजिस्ट) ची आवश्यकता आहे. म्हणजेच अन्न तंत्रज्ञान (फूड टेक्नॉलॉजी) अर्थातच अन्नप्रक्रिया उद्योग हे भारतासह जगातील विविध देशांमध्ये सर्वात जलद विकसित होणारे क्षेत्र असून याचा पाचवा क्रमांक लागतो. दहा वर्षात वीस लाख कोटींची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. हमखास नोकरीची संधी कृषी शिक्षणाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता अन्न तंत्रज्ञान (फूड टेक्नॉलॉजी) हे हमखास नोकरीची संधी व उज्ज्वल भविष्याचे क्षेत्र म्हणून उदयास येत आहे. या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय फूड प्रोसेसिंग कंपन्यांमध्ये फॅक्टरी मॅनेजर, सुपरवायझर, प्रोडक्शन ऑफिसर, क्वालिटी कंट्रोल ऑफिसर, रिसर्च व डेव्हलपर पदांवर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. सेंट्रल फूड टेक्नॉलॉजीकल रिसर्च इन्स्टिट्यूट (सीएफटीआरआय), म्हैसूर; भाभा ॲटोमिक रिसर्च इन्स्टिट्यूट (बीएआरसी) मुंबई; डिफेन्स फूड रिसर्च लॅबोरेटरी (डीएफआरएल) म्हैसूर; यांसारख्या केंद्रीय तसेच राज्यस्तरीय रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये वैज्ञानिक म्हणून संधी मिळू शकते. अन्न व औषध प्रशासन, अन्न सुरक्षा अधिकारी (फूड इन्स्पेक्टर) भारतीय खाद्य निगम यासारख्या सरकारी विभागामध्ये संधी मिळू शकते. याशिवाय अन्नतंत्रज्ञानाची (फूड टेक्नॉलॉजी) पदवी घेतलेला विद्यार्थी कृषी व अन्य प्रक्रिया संबंधित व्यवसाय सुरू करू शकतो. यावर्षीपासून शासनाने १२ वी ला जीवशास्त्र विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धा अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयात प्रवेशाची परवानगी दिली आहे. त्यामुळे आता अशा विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्णसंधी आहे.

# भारतीयांनो जागे व्हा..!

( आली बाबा आणि चाळीस चोर देश लुटत आहे ) भारत देशातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या धर्माला हिंदू धर्म म्हणतात. हे सांगायला पाहिजे असं नाही. आपण सर्वजण जाणतो. ह्या चातुर्वर्ण्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैष्य, शुद्र ह्या चार वर्णाचा उल्लेख केला जात्तो. त्यांची उत्पत्तीची उगमस्थाने अविश्वासनीय अशीच आहेत. या चार वर्णाचा पितामह एकच ब्रह्मदेव आहे तर त्या लोकात बंधूभाव असायला पाहिजे होता त्याचा तर इथे अभाव दिसतो.आणि हो जग याला मान्य करते का ?

एक कुटुंब म्हटले की त्या कुटुंबात साऱ्या कुटुंबियांना एका बापाची लेकरे असतात ती भावंडे सखी असतात किंवा सावत्र तरी असतात. आणि समाजातील असंख्य जाती ह्या तर उच्च निच भेदभाव करतात.उच्च कुळातील श्रीमंतीच्या बळाचा वापर जो तो धनवान, धनदांडगाही करू पाहतात त्या वर्णातील काही जाती लोकशाहीत राज्य कारभार करु पाहतात. या करिता जातीची टक्केवारी सांगून आपणास विजय प्राप्त व्हावा. हा उद्देश. तर दुसरीकडे साधारणपणे ज्यांची टक्केवारीच नसते ते बहुमतात निवडून जातात. याचे कारण ते या पृथ्वी तलावरचे (भारत भूमी) चे भू देव असल्याचे भासवतात. जनमानस अज्ञानात असल्याचे हे स्वार्थी लक्षण ह्या भू देवांनी पिढी दर पिढी कायम ठेऊन ते अधिकाधिक कायम ठेवणारी व्यवस्था निर्माण केलीय. अशी या समाजात शब्दप्रणालीही तयार केली. गर्व से कहो हम हिंदू हैं ! ही अशी घोषणा देशाला विभाजित करणारी आहे ही त्या पैकीच एक.हे कोण सांगेल ? दुसरी बाब भारताबाहेरील जनजीवन अर्थात जगातील मानव कुणाच्या उदरातून जन्मले . त्यांनी तरी ह्या वर्णाचा विचित्र उगमस्थान मान्य केला की अमान्य केला. यांचाही संदर्भ कुठेच का आढळत नाही.? आपण भारतीय आहोत यांत शंकेच कारणच नाही. कुणी उठतो तो जातीचा अभिमान बाळगतो. चांभार असतो तो म्हणतो चमार दी ग्रेट, तर कुणी भीमा कोरेगावचा इतिहास न विसरता महार दी ग्रेट असे संबोधतो. बाहेरील परकीय आले त्यांनी येथील जनतेला शासक असल्यामुळे धर्मप्रचार करुन मुस्लिम, ख्रिस्ती, केले.. बौद्ध, जैन, या धर्माचाही उल्लेख सापडतो. मात्र शासक वर्गापैकी सध्यातरी भारत देशात ब्राह्मणा (भू देव) शिवाय कोणीच आढळत नाही. हे या भू देवांना भारत म्हणजे पृथ्वी एवढंच माहित असावं. का? हे पटत नाही. जिथे भू देव जरी अल्पधारी तिथे भक्त ही प्रचंड संख्येनं भारी म्हणजे त्यांत नावीन्य असे काहीच नाही.भक्तांचं अज्ञान हे त्यावरुन दिसते. मातेचं उदर हेच नूतन बालकाचं जन्म स्थळ असतं. परंतु मातेच्या उदरा ऐवजी ब्रह्माने कोणत्या चार स्थळातून ही वर्णमालिका जन्मास घातली ठाऊक नाही असं नाही. पण सारं काही नॉन बायोलॉजिकल. हे त्यांचे धर्मशास्त्र सांगते.आजचे देशाचे प्रधानमंत्रीही असंच सांगतात.. गंमत अशी की वैद्यकीय क्षेत्रात निपुण झालेले वैद्य ( डॉक्टर ) हे का चूप आहेत ? असं म्हणतात मौनम सर्वार्थम साधनम. असं तर नाही. ह्या चमत्कारिक गोष्टीने लोकांना भावनिक दृष्टीने भडकावता येते.पण आपण लेख लिहिलायं तो अज्ञान दूर व्हावे. म्हणून लोकांना भडकावणे हा हेतू नाही. ब्राह्मण जरी झाला कितीही भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ. ह्या म्हणीचा पगडा जनमानसावर इतका रूढ झालाय की त्याला दुसरा पर्यायच उरला नाही. त्यामुळे भ्रष्टतेला आपोआप संरक्षण मिळतेय. भ्रष्ट यंत्रणेकडील राज्यातील कारभाराची सूत्रे जनकल्याण करतात ही



संकल्पनाच मोडीत निघालेली आहे. सभोवताली यापूर्वी अनेक लोकं सामान्यांचे असामान्य झाल्याचे पाहिले तसे अजूनही पाहतो आहोत. सोशल मीडियावर अशाप्रकारची लूट करणारांची यादी प्रकाशित होते तेव्हा देश आर्थिक संकटात येत आहे. हे ज्या मुळे होतेय त्यांना मोकळे ठेऊन, जनतेवर करा द्वारे ती तूट भरून काढणारे राज्यकर्ते देश आर्थिक दृष्ट्या बळकट करु पाहतात. हे म्हणणे विश्वासनीय नाही. अलीबाबा चाळीस चोर राजगादीवर बसलेत. असे म्हणणे भाग पडते. लहानपणी गोष्टीरूपाने ऐकलेल्या गोष्टी मनोरंजनात्मक वाटायच्या. त्याच आता खऱ्या वाटू लागल्यात. शालेय पाठय पुस्तकात नीतिमत्ता नसलेला असा अभ्यासक्रम तो यासाठीच असतो का? अशी सर्व सरकारी व्यवस्थेची स्थिती पाहिल्यावर न्याय व्यवस्थेवर जनता विश्वास ठेऊ इच्छित नाही. कारण गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे जनतेचा नाईलाज होतो आणि राजकारण्याचे फावते. एकूणच मागास विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षितांना संरक्षण न देणारे सरकार त्यांचे मुडदे सहजपणे पाहत असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणालेत शिका, संघटित व्हा, संघर्ष करा तर कुठला मागासवर्ग आपल्या मुलाबाळांना शिक्षण घेण्याचं कर्तव्य करील. आता संघर्ष करण्याची वेळ अर्थात रणांगणात उतरण्याची वेळ आली की प्रत्यक्षात भीमा कोरेगाव आठवलेच म्हणून समजा. मग संसदेत राखीव जागेवर जाऊन बसतात त्यांना मुके राहता ज्ञान नसते असाच मुंबईत भायखळ्यातील खडा पारशा गत त्याची अवस्था असते. आपण मात्र फसगत करुन घेतो. त्याला आपलं समजून, आवाज सत्तेत नाही संसदेत नाही मग रस्त्यावर बोंबलण्यात अर्थ काय ? फुक्कटची जीवितहानी. जीवितहानी झाल्यावर पाकीटबाजी. त्याचीच चर्चा. आता हेच बघा ना, भारताच्या गृहमंत्र्याचे विधानाकडे पाहू या. ते असे म्हणतात की आजकल आंबेडकर आंबेडकर आंबेडकर आंबेडकर आंबेडकर आंबेडकर आंबेडकर नाम लेना फॅशन हो गया हैं, इतना अगर नाम भगवान का लेते तो सात जन्मो तक स्वर्ग मिल जाता! या गृहमंत्र्याच्या वाक्याने उग्र संताप अखंड देशभर व्यक्त झाला. आणि आंबेडकरवादी, आंबेडकरप्रेमी, आंबेडकरी जनता, आंबेडकर अनुयायी गृहमंत्र्याच्या विधानाचा विरोध करु लागली. ती बीजेपी आरएसएस च्या विरोधात बोलू लागली. यामध्ये सर्व राजकीय संघटना अग्रेसर होत्या, आहेत. जर हेच विधान पुढीलप्रमाणे पॉझिटिव्हली गृहमंत्र्याकडून म्हटले गेले असते तर...! आम्ही कसे रिऍक्ट झालो असतो ? मागासलेल्यांची मतें माझ्याच पक्षाला मिळावी म्हणून आजवर त्या त्या सर्वच मागासांसह इतर पक्षानीही, आंबेडकर आंबेडकर आंबेडकर का नाम लेकर अब सिर्फ फॅशन नहीं करना हैं । जनता से वोट मांगने वालो अगर वह एक साथ होकर एक ही राजकीय पार्टी बनाकर वोट मांगते तो आज वह देशपर राज करते. लेकिन ऐसा हुआ नहीं. क्यूँ की वे राज्य संभालने को सक्षम नहीं हैं । और जो भारतके संविधान को बार बार बदलने की बात करते हैं उन्हे जहां से वे आये थे वही रास्ते से उन आर्य ( युरेशियन ) लोगों को याने खैबर खायी के रास्ते भारत आये थे उन्हे वापीस भेजा जा सकता हैं ।

यह तीन टक्के % लोगो का हमारी जिंदगीसे खिलवाड करने का खेल अब हम बंद कर सकते हैं और संविधान बदलने वालों को भी बदल सकते हैं । जब हम जाग जायेंगे तो जागना पडेगा ।

परंतु म्हणतात ना ससा जाई आपल्या वसा. अगदी सारेच घडून गेले. हाती आले धुपाटणे. भारत सरकारने अलीकडेच ज्यू ( यहूदी )सलोकांचे त्यांना त्यांच्या माय देशात (इस्त्रायल) ला १९८०-८५ च्या दरम्यान पुनर्वसन केल्याचे म्हणतात त्याची आठवण झाली. त्या प्रमाणे ह्या युरेशियननांचे - आर्य ब्राह्मणांचे पुनर्वसन त्यांच्या मायभूमीत भारत सरकार करील काय ? आंतरराष्ट्रीय पातळीवर युनो त चर्चे अंती ही समस्या निकालात काढता येईल काय ? जो वर्ग शासक असो वा नसो तो इंग्रज, पोर्तुगीज, ब्रिटिश, डच, जर्मनी,फ्रान्स,मोगल, ज्यू,आर्य या प्रमाणे परदेशी आहे, तो इथला मूलनिवासी नाही हे नक्की झाल्यावर यावरचा स्थलांतरीत होण्याचा हाच उपाय भारत सरकारने अंमलात आणल्यास भारतात शांतता प्रस्थापित होईल.!!! भारतास शांतता हवी असेल तर भारत सरकारने ह्या कामास अग्रस्थान द्यावे ही सरकारला विनंती ! जय भारत ! जय संविधान !

*********

मधुकर मोहिते ( कवी - साहित्यिक ) नेरूळ नवी मुंबई, २९ जानेवारी २०२५.

# विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतीन शिबीरातील अनुभव घेऊन राष्ट्र निर्माणासाठी पुढे यावे- पो.नि. सुनील बिर्ला

किनवट:शेख शौकत :- राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल अशी संस्काराची शिदोरी प्राप्त होते त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरात अनुभव घेऊन भविष्यात राष्ट्र निर्माण साठी पुढे यावे असे प्रतिपादन सरस्वती विद्यामंदिर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय निवासी शिबिराच्या समारोप प्रसंगी मौजे बोधडी येथे किनवटचे पोलीस निरीक्षक श्री बिर्ला साहेब यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती शिक्षण संस्थेचे सचिव तथा सरस्वती विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कृष्णकुमार निर्माण होते यावेळी व्यासपीठावर जेष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर, आशिष देशपांडे ,सुधाकर कदम व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भंडारे हे उपस्थित होते.

मौजे बोधडी बुद्रुक येथे सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवस दिनांक २३ जानेवारीपासून ते २९ जानेवारी पर्यंत पार पडले या शिबिराचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला युथ फॉर माय भारत युथ फॉर डिजिटल लिटरसी या विषयाला घेऊन सात दिवसांमध्ये विविध अशा कार्यक्रमाचे आयोजन या शिबिरात करण्यात आले समारोपीय कार्यक्रमात प्रसंगी सुरुवातीला कुमारी नेहा मडावी हिने स्वागत गीत गाऊन उपस्थितांचे स्वागत केले तर विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात केले व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचा सरस्वती शिक्षण संस्थेच्या वतीने शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या शिबिराच्या एकूणच कार्याचा कार्य अहवाल कार्यक्रमाधिकारी प्रोफेसर डॉ मार्तंड कुलकर्णी यांनी सादर केला या सात दिवसांमध्ये विविध उपक्रमाला हाताशी घेऊन विद्यार्थ्यांनी बौद्धिक श्रमदान तसेच मनोरंजनाच्या विविध अशा कार्यक्रमाचा कसा आनंद घेतला याचा उहापोह प्रास्ताविकातून डॉ. कुलकर्णी यांनी केला. आपल्या मौलिक अशा मनोगत आतून देशोन्नतीचे जेष्ठ पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक राष्ट्र कार्यात येण्याचे आवाहन करत विद्यार्थ्यांनी लेखन वाचन व कलागुणांना वाव द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली तर दैनिक प्रजावाणीचे पत्रकार आशिष देशपांडे यांनी अशा शिबिरातून विद्यार्थी घडतो व भविष्यात तो भारताचा सक्षम नागरिक तयार होतो हे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांनी एकूणच या शिबिराच्या कार्याचे महत्त्व सांगत शिबिरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा घडतो हे सांगून अशा शिबिराची आवश्यकता का आहे यावर भर दिला. प्रमुख पाहुणे



किनवट पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी विद्यार्थ्यांना विविध असे उदाहरण देऊन कायदा सुव्यवस्था याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे पोलिसांची प्रत्येक ठिकाणी गरज न पडू देता आपणच सक्षम पोलीस होऊन समाज उभारणीत योगदान द्यावे असे आव्हान त्यांनी यावेळी केले. आपल्या अध्यक्ष समारोपात कृष्णकुमार नेमानीवार यांनी अशा शिबिराची उपयोगिता मांडत मी सुद्धा अशाच शिबिरातून कसा घडत गेलो व आज या शाळेचा मुख्याध्यापक म्हणून काम करतो आहे हे सांगून विद्यार्थ्यांनी निकोप समाज उभारणीसाठी पुढे यावे असे आवाहन केले. यावेळी व्यासपीठावर बोधडी भागातील ज्येष्ठ पत्रकार सुधाकर कदम शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता येरावार उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके व सुंदर सूत्रसंचालन डॉ किरण आयनेनीवार यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोहर थोरात यांनी केले यावेळी सात दिवशी शिबिरात भाग घेतलेल्या वैभव मेटकर करण घोगेवार दत्ता ढोले कु. कोमल मेश्राम कु. नेहा मडावी यांनी आपले अनुभव व्यक्त करून हे शिबिर आमच्यासाठी किती महत्त्वाचे ठरले यावर भर दिला. या शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमासाठी बोधडी येथील शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती येरावार, शाळेचे सर्व शिक्षक महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, महाविद्यालयाचे ग्रंथपाल माधव नेमानीवार, शिक्षकेतर वर्ग विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्यासह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांची उपस्थिती लाभली होती.

## चंकी पांडेप्रमाणे रोज अधिक प्रमाणात 'व्हिटॅमिन सी'चे सेवन केल्यास शरीरावर काय परिणाम होतात? ही सवय चांगली की वाईट, घ्या जाणून

चंकी पांडे हे बॉलीवूड चित्रपटसृष्टीतील सर्वात नावाजलेले नाव आहे. ९० च्या दशकात त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने सर्वांची मनं जिंकली, हा अभिनेता सोशल मीडियावरही खूप सक्रिय असतो. नुकतंच चंकी पांडेने त्याच्या एका आहाराच्या सवयींविषयी एक खुलासा केला आहे, ज्यात त्याने मी रोज मोठ्या प्रमाणात व्हिटॅमिन सीचे सेवन करत असल्याचे सांगितले आहे.



आपल्या आहाराच्या सवयींविषयी बोलताना चंकी पांडे म्हणाले की, मी रोज अधिक प्रमाणात व्हिटॅमिन सीचे सेवन करतो. मी रोज लिंबूपाणी पितो. भिजवलेल्या खजुराचे पाणी पितो. माझ्याकडे व्हिटॅमिन सी सप्लिमेंटसुद्धा आहेत. त्या सप्लिमेंट मी रोज चघळत बसतो. इतकेच नाही तर रोज सकाळी मला दोन लसूण चावून घायला आवडते.

चंकी पांडे पुढे सांगतो की, मी दररोज स्विमिंग पूलमध्ये पोहतो. हे करायला मला आवडते, कारण हा एक ध्यानाचा प्रकार आहे, यावेळी ना कोणाचा फोन ना कोणाशी बोलणं. पाणी वर खाली होत असतं आणि मी माझ्यातच हरवलेला असतो. यावेळी मला वाटते की, मी एक शार्क आहे. पण, चंकी पांडेच्या या सवयींचा आपल्या शरीरावर कसा परिणाम होतो. विशेषतः व्हिटॅमिन सीचे अधिक सेवन केल्याने शरीरावर नेमके कोणते परिणाम होतात जाणून घेऊ

शरीरास किती प्रमाणात व्हिटॅमिन सीची आवश्यकता असते?

हैदराबादमधील एलबी नगर येथील ग्लेनेगल्स अवेअर हॉस्पिटलमधील आहारतज्ज्ञ डॉ. श्वेता बिराली यांनी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना सांगितले की, व्हिटॅमिन सी किंवा एस्कॉर्बिक ॲसिड हे शरीरासाठी महत्त्वाचा पोषक घटक आहे. व्हिटॅमिन सीच्या सेवनामुळे रोगप्रतिकारशक्ती, कोलेजनची पातळी वाढते, तसेच ते पॉवरफूल अँटिऑक्सिडंट म्हणून काम करते. यात पोषक तत्वांचे प्रमाण अधिक असले तरी त्याचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने शरीरावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात. त्यामुळे त्याचे सुरक्षित आणि मर्यादित सेवन करणे आवश्यक आहे. तसेच यात तुम्ही कोणते व्हिटॅमिन सीयुक्त पदार्थ खाताय, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

एका प्रौढ व्यक्तीला रोज जवळपास ६५-९० मिलिग्रॅम व्हिटॅमिन सीची गरज असते. पण, ती व्यक्ती दररोज व्हिटॅमिन सीचे जास्तीत जास्त २००० स मिलीग्रॅमपर्यंत सेवन करू शकते. पण, यापेक्षा अधिक प्रमाणात सेवन केल्याने अतिसार, मळमळ, पोटदुखीची समस्या जाणवू शकते. गंभीर प्रकरणांमध्ये शरीरात ऑक्सलेट जमा होत किडनी स्टोनचा त्रास होऊ शकतो, असेही डॉ. श्वेता म्हणाल्या.

व्हिटॅमिन सीयुक्त फळं आणि त्याचे आरोग्याला मिळणारे फायदे

आहारतज्ज्ञ डॉ.श्वेता यांनी पुढे सांगितले की, संत्री, पेरू, किवी, शिमला मिरची आणि स्ट्रॉबेरी यांसारख्या नैसर्गिक पदार्थांमध्ये व्हिटॅमिन सीचे प्रमाण अधिक असते. या पदार्थांच्या सेवनाने शरीरास अधिक प्रमाणत फायबर आणि इतर पोषक तत्व मिळतात.


ज्या व्यक्तींच्या शरीरात व्हिटॅमिन सीची कमतरता असते, अशा व्यक्तींची व्हिटॅमिन सीची गरज भागवण्यासाठी पूरक आहार आवश्यक असतो. (उदा. आजारपण किंवा गर्भधारणेदरम्यान), पण अशा व्यक्तींनी व्हिटॅमिन सीचे सेवन करण्यापूर्वी किंवा व्हिटॅमिन सीयुक्त सप्लिमेंट घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे, असेही डॉ. श्वेता यांनी नमूद केले.

व्हिटॅमिन सी पाण्यात विरघळणारे आहे, त्यामुळे सातत्याने त्याचे अधिक प्रमाणात सेवन केल्यास ते शरीरातून उत्सर्जित होते, ज्यामुळे शरीरावर ताण येऊ शकतो. त्यामुळे व्हिटॅमिन सीच्या सेवनाने शरीराचे नुकसान न करता अधिक फायदे मिळण्यासाठी त्याचे प्रमाणात सेवन करणे गरजेचे आहे. इतकेच नाहीतर नेहमी संतुलित आहार सेवन करा, व्हिटॅमिन सी सप्लिमेंट्स घेण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्या, असेही डॉ. श्वेता म्हणाल्या.

## छातीत दुखणे हे नेहमी हार्ट अटॅक येण्याचे लक्षण असते का? तज्ज्ञ काय सांगतात

छातीत दुखण्याचा थेट संबंध हृदयविकाराच्या झटक्याशी जोडला जातो. छातीत दुखण्याचं लक्षण जरी सौम्य वाटत असले तरी काही वेळा मेडिकल इमर्जन्सीचे कारण ठरू शकते. पण तुम्हाला माहिती आहे का, जरी छातीत दुखणे या लक्षणाचा संबंध हृदयविकाराच्या झटक्यांसह हृदयाशी संबंधित समस्यांशी जोडत असला, तरी ही समस्या हृदयाद्वारे उद्भवलेली नसते.

द इंडियन एक्स्प्रेसनी इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटलसमधील कार्डिओथोरॅसिक आणि व्हॅस्क्युलर सर्जरीचे वरिष्ठ सल्लागार डॉ. मुकेश गोयल यांच्या हवाल्याने छातीत दुखण्याची सामान्य कारणे आणि त्यावर उपचार कसे करावे, याविषयी माहिती सांगितली आहे.



छातीत दुखण्याची सामान्य कारणे -

१. हृदयविकाराशी संबंध नसलेली कारणे

छातीत दुखणे हे लक्षण प्रत्येकवेळी हृदयाशी संबंधित नसते. इतर कारणांमुळेसुद्धा छातीत दुखू शकते.

गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्या

ॲसिड रिफ्लक्स किंवा छातीत जळजळ वाटल्याने छातीत दुखू शकते, ज्याला अनेकदा आपण हृदयविकाराचा झटका येण्याचे लक्षण समजतो.

स्नायुशी संबंधित समस्या

छातीच्या स्नायूंमध्ये झालेली दुखापत किंवा ताण आल्याने छातीत कळ येणे किंवा छाती दुखणे, अस्वस्थता जाणवणे, अचानक श्वासोच्छ्वास वाढणे ही लक्षणे दिसून येतात.

एंग्झायटी आणि पॅनिक अटॅक

तणाव आल्याने छातीत दुखणे हे एंग्झायटी किंवा पॅनिक अटॅकचे लक्षण आहे. यामध्ये अचानक हृदयाचे ठोके वाढणे, श्वास घेण्यास त्रास जाणवणे आणि छाती दाटून येणे इत्यादींचा समावेश असू शकतो.

२. हृदयाशी संबंधित कारणे

हृदयविकाराच्या स्थितीत छातीत दुखणे सहसा गंभीर असते आणि त्यासाठी लगेच वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यकता असते, असे डॉ. गोयल सांगतात.

अन्जायना (-पसळपर):

जेव्हा हृदयाचा रक्तपुरवठा कमी होतो तेव्हा छातीत दुखते, या प्रकाराला अन्जायना म्हणतात. अनेकदा यामुळे शारीरिक हालचालींवर परिणाम होतो किंवा तणाव वाढतो आणि छातीत दाब निर्माण झाल्यासारखे वाटते.

हृदयविकाराचा झटका :

हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी छातीत दाब निर्माण होणे किंवा छातीत दाटून येणे आणि अनेकदा हा दाब हात, पाठ, मान किंवा जबड्यात पसरण्याची शक्यता असते. इतर काही लक्षणे खालीलप्रमाणे -

श्वास घेण्यास त्रास होणे
घाम येणे
मळमळ वाटणे

वैद्यकीय सल्ला कधी घ्यावा?

छातीत दुखण्याकडे कधीही दुर्लक्ष करू नये. याबाबत सावधगिरी बाळगून डॉक्टरांशी संपर्क साधला पाहिजे.

## उलवे-नोड नवी मुंबईतील मच्छर प्रादुर्भावावर समाजवादी पक्षाच्या प्रयत्नांना यश

नवी मुंबई / के. एच. हनवते :- २८ जानेवारी २०२५ नवी मुंबईतील उलवे-नोड मध्ये वाढत्या मच्छरांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढल्यामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण पडत होता. यापार्श्वभूमीवर, समाजवादी पार्टीचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष, मिथुन भाऊदास कांबळे यांनी यावर उपाययोजना करण्यासाठी तातडीने पुढाकार घेतला प्रशासनाला पाठपुरावा आणि उपाययोजना समाजवादी पक्षाच्या वतीने मुख्य आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले, ज्यामध्ये खालील महत्त्वाच्या उपाययोजनांची मागणी करण्यात आली होती:




१) नियमित फॉगिंग: मच्छरांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी परिसरात वेळोवेळी फॉगिंग करणे.

२) सांडपाण्याची योग्य व्यवस्था: उघड्यावर साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना करणे.

३) जागरूकता मोहीम: स्थानिक नागरिकांना मच्छरजन्य आजारांपासून बचावाचे मार्गदर्शन आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे.

४ ) तांत्रिक उपाययोजना: अत्याधुनिक साधनांचा वापर करून मच्छर नियंत्रणासाठी प्रभावी योजना आखणे.


प्रशासनाची तत्काळ कारवाई समाजवादी पार्टीच्या या पाठपुराव्यानंतर आरोग्य विभागाने तातडीने कारवाईला सुरुवात केली. काही दिवसांतच फॉगिंग मशीन तैनात करण्यात आले, सांडपाणी आणि डबकी हटवण्यात आली, तसेच जनजागृती मोहिमाही राबवण्यात आली. नागरिकांचा प्रतिसाद आणि समाधान प्रशासनाच्या या वेगवान कारवाईमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. आम्ही गेले अनेक महिने मच्छरांच्या समस्येने त्रस्त होतो. समाजवादी पार्टीच्या प्रयत्नांमुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला आहे, असे एका रहिवाशाने सांगितले. समाजवादी पक्षाचा पुढील निर्धार मिथुन कांबळे यांनी सांगितले की, नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नांवर आम्ही सतत जागरूक आहोत. प्रशासनाने केलेली कारवाई समाधानकारक असली तरीही आम्ही यावर लक्ष ठेवू आणि गरज पडल्यास अधिक तीव्र पद्धतीने पाठपुरावा करू. समाजवादी पार्टीच्या या पुढाकारामुळे नवी मुंबईतील अनेक रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन काम केल्यास आरोग्यविषयक समस्या प्रभावीपणे सोडवता येऊ शकतात, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.



## शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणत्या पदार्थांचे सेवन करावे आणि करू नये? जाणून घ्या सविस्तर फळे भाज्यांचे

शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. शरीरामध्ये कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्यानंतर आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे धावपळीच्या जीवनशैलीतून वेळ काढत आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये सतत होणारे बदल, शरीरात निर्माण झालेली पाण्याची कमतरता इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून यतो. चुकीच्या आहारामुळे शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढू लागते. कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर पिवळ्या रंगाचा चिकट थर रक्तवाहिन्यांमध्ये तसाच साचून राहतो. ज्यामुळे इतर आजार होण्याची शक्यता असते. त्यामुळे नेहमी आरोग्याची काळजी घ्यावी.(फोटो सौजन्य - ळडींलज्ञ)

रक्तवाहिन्यांमध्ये खराब कोलेस्ट्रॉल साचून राहिल्यानंतर हृदयाच्या रक्तवाहिन्या आणि संपूर्ण शरीराच्या रक्तवाहिन्या काहीवेळा ब्लॉक होण्याची शक्यता असते. यामुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढू लागतो. त्यामणुळे रक्तात साचून राहिलेले अतिरिक्त कोलेस्ट्रॉल काढून टाकण्यासाठी आहारात तेलकट किंवा अतितिखट पदार्थांचे सेवन करू नये. आज आम्ही तुम्हाला वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणत्या पदार्थांचे करावे आणि करू नये? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चाल तर जाणून घेऊया.



तेलकट पदार्थांचे सेवन करू नये:शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल आरोग्यासाठी आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. त्यामुळे तेलकट पदार्थांचे सेवन करू नये. तेलकट पदार्थांमध्ये असलेले अतिरिक्त तेल रक्तामध्ये सर्बीचे प्रमाण वाढवण्यास मदत करतात. त्यामुळे जेवणाच्या ताटात नेहमी कमी साखरेचे आणि पचनास हलके वासनेने पदार्थ खावेत. तेलकट अन्नपदार्थ खाल्यामुळे रक्तातील साखर, रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी वाटू लागते.

स्वयंपाकासाठी ऑलिव्ह ऑईलचा करा वापर:

ऑलिव्ह ऑईल आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. या तेलात असलेले गुणधर्म आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतात. त्यामुळे जास्त कोलेस्टरलची पातळी वाढलेल्या लोकांनी आहारात ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. या तेलात बनवलेले पदार्थ पदार्थ आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. यामध्ये हेल्दी फॅट्स असतात, ज्यामुळे वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहण्यासाठी मदत होते.

सुका मेवाचे सेवन:

आरोग्य सुधारण्यासाठी आहारात सुका मेवा खाल्ला जाते. यामुळे शरीराची ताकद आणि ऊर्जा वाढण्यास मदत होते. आहारात बदाम, काजू, अक्रोड, भोपळ्याच्या बिया, खरबूज बिया, चिया सीड्स इत्यादी अनेक वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन करावे. यामुळे वाढलेली कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणत राहते. कोलेस्टरॉलने त्रस्त असलेल्या लोकांनी नियमित काजूचे सेवन करावे.

फळे भाज्यांचे सेवन:

दैनंदिन आरोग्य निरोगी जगण्यासाठी आहारात फळे, भाज्या, हिरव्या भाज्या इत्यादी पदार्थांचे सेवन करावे. फळांमध्ये असलेली साखर आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. फळे आणि भाज्यांमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. यामुळे शरीराचे कोलेस्ट्रॉल कमी होऊन जाते.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

केज/तात्या गवळी राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळा ही शहरातील नामांकित शाळा आहे.ही शाळा वर्षानुवर्ष संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य करीत आहे असे प्रतिपादन केजच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे यांनी केले. राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात ते बोलत होते.

स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी रंगमंचावर आपले कलागुण सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्वलन व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेसाहेब देशमुख,प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे,केंद्रप्रमुख संजय चवरे,नगरसेवक बाळासाहेब गाढवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे उपाध्यक्ष अंकुशराव इंगळे,सचिव गदळे जी.बी.,संचालक वासुदेव डोंगरे,जाधव आर.जी.,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.,शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक चौधरी बी.डी.यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम,राष्ट्रीय एकात्मता याबाबतचे गीत व अभिनय सादर करत सामाजिक संदेश दिला.सांस्कृतिक गीतातुन देशात विविध जाती-धर्माचे-पंथाचे लोक राहत असले तरीही राष्ट्रहितासाठी सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे असा संदेश दिला.महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा सांगणारे लोकगीत,लावणी,भक्ती गीत यांनी कार्यक्रम आणखीनच बहारदार केला.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रमिक अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा,उपक्रम,सांस्कृतिक कार्यक्रम या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात.भविष्यातील कलाकाराचा पाया इथेच घातला जातो यासाठी शाळेकडून अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यादव व्ही.बी.यांनी केले तर आभार डिरंगे जी.बी.यांनी मानले. देशमुख ए.डी,क्षीरसागर आर. एस,मस्के जे.आर.,श्रीमती गायकवाड ध्वजा,श्रीमती जाधव अनिता यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.उत्कृष्ट नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद यांचे अभिनंदन केले.स्नेहसंमेलनासाठी पालकांची उत्तम उपस्थिती होती.

# लातूर शहरात गंठण चोरी करणारा सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात




लातूर : शहरातील अनेक भागात महिलांच्या गळ्यातील गंठण हिसकावून घेण्याच्या घटना समोर आल्याने पोलिसांसमोर आव्हान उभे होते. आरोपींना तात्काळ जेरबंद करण्यासाठी पोलिस अधिक्षक सोमय मुंडे यांच्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले होते. पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ३१ जानेवारी २०२५ रोजी दुपारी २ च्या सुमारास राजू सहदेव जाधव या सराईत गुन्हेगारास पथकाने मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे. पायी चालत जाणाऱ्या महिला आणि आजूबाजूला कुणी नाही हे लक्षात घेऊन त्यांच्या गळ्यातील गंठण हिसकावण्याच्या ३ घटना शहरात घडल्या होत्या. याबाबत शिवाजी नगर पोलिस स्थानकात गुन्हे दाखल झाले होते. या आरोपीचा मागोवा घेत राजीव गांधी चौक येथे पोलीस पथक आले असता त्यांना एक संशयीत इसम थोरमोटे पेट्रोल पंपाच्या बाजूस असलेल्या गणेश विद्यालय समोर उभा असल्याची गुप्त माहिती मिळाली त्यानुसार स्थागुशा पथकाने तात्काळ कारवाई करीत राजू सहदेव जाधव वय २२ वर्ष रा. याकतपूर, ता. औसा यास ताब्यात घेतले. सखोल चौकशी केली असता ६ महिन्यापूर्वी नारायण नगर, १५ दिवसांपूर्वी कन्हेरी मंत्री नगर तर २ दिवसांपूर्वी दत्तमंदीर जवळ महिलांच्या गळ्यातील गंठण हिसकावून घेतले असल्याची कबुली दिली. हे दागिणे विकण्यासाठी राजू लातुरात आला होता. त्याच्याजवळ ६८ ग्रॅम वजनाचे ३ गंठण आढळून आले. पोलिसांनी गुन्ह्यात वापरली गेलेली स्प्लेंडर प्लस ही दुचाकी यासह ३ लाख २३ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून शिवाजी नगर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे युवराज गिरी, राहुल सोनकांबळे, अर्जुन राजपूत, देवकते, सुरवसे, कंचे, चलवाड, मदने तर शिवाजी नगर पोलीस स्थानकातील कोतवाड, सोनवणे यांचा सहभाग होता.

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा ४ फेब्रुवारी रोजी बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा

लातूर : - लातूर तालुक्यातील दिंडेगाव रोडवर मौजे रामेश्वर परिसरात शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्यासाठी उभा राहत असलेल्या संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यासह भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याची चेअरमन राजेश कराड यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण मतदार संघातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रामेश्वर परिसरात संत श्री गोपाळबुवा महाराज शुगर अँन्ड ग्रो फुड इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याची उभारणी करण्यात आली असून या कारखान्याचा रोलर पूजनचा कार्यक्रम गेल्या १२ नोव्हेंबर रोजी परिसरातील हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या आणि स्वप्नपूर्तीच्या वातावरणात संपन्न झाला.

चालू हंगामात साखर कारखान्याचे गाळप सुरू व्हावे या दृष्टीने विविध अडचणीवर मात करत युद्धपातळीवर कारखान्याच्या उभारणीचे काम सुरू झाले असल्याचे सांगून चेअरमन राजेश कराड यांनी उभारणीस उशीर झाला असला तरी चालू गळीत हंगामाच्या अंतिम टप्प्यात प्रत्यक्ष गाळपाला सुरुवात होणार आहे. त्यानुसार येत्या ४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा अध्यात्मिक क्षेत्रातील परमपूज्य विद्यानंद सागर महाराज गातेगाव, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरी, हभप लालासाहेब नाना पवार, हभप बाबा महाराज बोराडे आणि जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते आयोजित करण्यात आला आहे.



श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळ्यास कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आणि कारखान्याच्या भागधारकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीराम अण्णा कराड आणि राजेश कराड यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्राचार्य, प्राध्यापक आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभागाच्यावतीने प्राचार्य डॉ. संजय गवई यांना भारतीय दलित पँथरचा पहिला राज्यस्तरीय शीलरत्न पुरस्कार-२०२४ प्राप्त झाल्याबद्दल, स्कूल ऑफ ऑनलाइन एज्युकेशन करिता भारतीय दर्शन शास्त्राचा परिचय हा अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी प्रा. अलका चिकुर्डेकरकर यांची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे निवड झाल्याबद्दल, राज्य पात्रता चाचणी परीक्षेत प्रा. रत्नाकर केंद्रे हे उत्तीर्ण झाल्याबद्दल आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा-२०२४ परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी सूर्यवंशी हिला एम. ए. तत्त्वज्ञान विषयात सुवर्णपदक मिळाल्याबद्दल त्यांचा तत्त्वज्ञान विभागातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी तत्त्वज्ञान विभागप्रमुख डॉ. शितल येरुळे, प्रा. दयानंद बोयने, प्रा. श्रीराम देशपांडे, संशोधक विद्यार्थी जगन्नाथ कदम, सिद्धेश्वर घोडके, वैशाली दिवे आणि तत्त्वज्ञान विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रा. अलका चिखूर्डेकर, प्रा. रत्नाकर केंद्रे आणि सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थिनी साक्षी सूर्यवंशी यांनी आपापले मनोगते व्यक्त केली.



यावेळी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी गुणवंत प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि तत्त्वज्ञान विभागाचे मनःपूर्वक आभार मानले त्यांच्या या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, कार्यकारी संचालक आणि सर्व संचालक, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, पदव्युत्तर विभागप्रमुख डॉ. यशवंत वळवी, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# भाजपच्या महिला मोर्च्या सरचिटणीस सौ.निर्मला कांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त अण्णाभाऊ साठे विद्यालयात आरोग्य शिबीर संपन्न

लातुर-दि-लातूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विद्यालयात भाजपा महिला मोर्चाच्या सरचिटणीस सौ.निर्मलाताई कांबळे यांच्या वाढदिवसा निमित्त आज दि १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आरोग्य शिबिर घेण्यात आले यावेळी नांदेड रोड परिसरातील नागरिकांनी या आरोग्याचे बिराचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला राजमाता जिजाऊ व शिक्षणाची मुहुर्त मेढ रवणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे भाजपा नेत्या डॉ. सौ.आर्चणाताई पाटील चाकुरकर,भाजपा जिल्हाध्यक्ष .देविदास काळे,भाजपा प्रवक्ता प्रेरणाताई होणराव,महिला मोर्चा अध्यक्षा सौ.रागीणीताई यादव,महिला मोर्चा सरचिटणीस सौ.रत्नमालाताई घोडके यांच्या हस्ते पुजन करून दिप प्रज्वलीत करीत शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी लातूर शहर पुर्व भागातील नागरीकांचे रक्त तपासणी व आयुष्यमान कार्डचे मोफत देण्यात आले.यावेळी भारतीय जनता पार्टी सरचिटणीस रविभय्या सुडे,दिग्वीजय काथवटे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मंडल अध्यक्ष प्रमोद गुडे,सरचिटणीस सचिन मदने,पुर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,बाबासाहेब बनसोडे,वसिमभय्या पटेल,आतिष कांबळे,संतोष तिवारी महिला मोर्चा सरचिटणीस शोभाताई कोंडेकर,मंडळ अध्यक्षा सौ.जयश्री भुतेकर,सुमनश्री राठोड,सुनिता उबाळे,निर्मला आलापुरे तसेच पुर्व भागातील जेष्ठ नागरिक महिला,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते



# लिंगभाव दृष्ट्या संवेदनशील प्रबुद्ध भारत हवा - डॉ. सुधीर मस्के






लातूर :- स्वारातीम विद्यापीठ,उप-परिसर, लातूर सामाजिक शास्त्रे संकुलाच्या वतीने लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर ३१ जानेवारी रोजी एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या कार्यशाळेसाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील विद्यार्थी प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थित होते. विविध सत्रांत संपन्नझालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे सर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले, लिंगभाव संवेदनशीलता , लैंगिक न्याय आणि लैंगिक समानतेच्या मुद्द्यांसाठी संवेदनशील पद्धतीने वागण्याची जागरूकता एक सूचितप्रवृत्ती म्हणून पाहिले जाऊ शकते. लिंगभावाबद्दलचे शिक्षण-प्रशिक्षण आणि जागरुकता वाढविण्याच्यादृष्टीने ही कार्यशाळा महत्वाची ठरत आहे. संपन्न झालेल्या विविधसत्रांपैकी एका सत्रात 'युवकांची लिंगभावन्यायाबद्दल समज, भूमिका व क्षमताबांधणी या विषयावर मत व्यक्त करताना दीपा पवार म्हणाल्या की, स्त्री अभिव्यक्ती, मानवता आणि सामाजिक क्षेत्रांमधील हा विषय अतिशय महत्वाचा आहे. लैंगिक संवेदीकरणा सोबतच हा राजकीय आर्थिक सामाजिक सत्तेच्या हस्तांतरणाचा विषय आहे, आज सबलीकरणाचे अर्थ आपण कसे रचले ते समजून घेत त्याला बदलण्याची गरज आहे. सोबतच इतिहासातील स्त्रियांची भूमिका जाणून स्त्री प्रश्नच आपलं आकलन अधिक व्यापक आणि एकसत्वीकरण करणार नसावं. विषमतेचे स्तर आपण समजून घेतले पाहिजेत. लिंग समानता आणि न्याय इ.साठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. समकालीन स्त्री प्रश्नावर प्रकाश टाकत संविधान हे स्त्रीवादी असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. दिल्ली विद्यापीठ,दिल्ली येथील डॉ. सुधीर मस्के यांनी दलितमहिलांची आत्मकथने व लिंगभाव संवेदनशीलता या विषयावर आपले मत व्यक्त करताना,आज संवेदनशीलता शिकवण्याची गरज असून त्याबद्दलस्पष्ट आणि अचूक दृष्टीकोन विकसित केला पाहिजेत तसेच लैंगिक समानतेच्या चिंतेबद्दल जागरुकता निर्माण करून दृष्टीकोन बदलण्याची गरज आहे. आज विकसित भारत तेव्हाच शक्य होईल जेव्हा तो लिंगभाव दृष्ट्या संवेदनशील प्रबुद्ध भारत होईल तसा भारत निर्माण होण्याची आवश्यकता आहे. यासाठी शिक्षण व्यवस्थेमधून लिंगभाव विषयक विचारांची रुजवणूक होणे गरजेचे आहे. याप्रसंगी डॉ. अंजली जोशी यांनी जेंडर गॅप आणि सक्षमीकरणापुढील आव्हाने,लोकप्रिय माध्यमातून उत्पादित होणारी लिंगभाव विषमता, त्या सर्वांवर कशा प्रकारे उपाय योजावे यावर आपले मत प्रस्तुत केले तर प्रा. अनिता गायकवाड यांनी कामाच्या ठिकाणी लिंगभाव संवेदीकरणाचे महत्व प्रस्तुत करत असताना याविषयावर सकारात्मक दृष्टीने प्रत्यक्ष कार्य करण्याची गरज आहे. हा विचार मांडला. प्रा. डॉ.अशोक नारनवरे यांच्या वक्तृत्वात पशु ते माणूस इथपर्यंतचा प्रवास व्यक्त करीत असताना ऐतिहासिकस्त्री चरित्रे व त्यांच्यावरील झालेल्या अन्याय-अत्याचारावर प्रकाश टाकला. तर समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. पी. घायाळ यांनी बाईपण म्हणजे शोषण प्रक्रियेचाएक भाग असून यासाठी लिंगभाव संवेदनशीलता एक प्रशिक्षण जाणीव आहे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगीस्वारातीम विद्यापीठ उप-परिसर, लातूरचे संचालक डॉ. राजेश शिंदे यांनी पी. एम. उषा अंतर्गत आयोजित कार्यशाळेची एकूण पार्शवभूमी, संकल्पना स्पष्ट करताना म्हणाले की, आज बदलत्या समाजातील संपूर्ण व्यवस्था तंत्रज्ञान विज्ञान बदलेली आहे. यासाठी युवापिढीने ही बदलणं महत्वाचं असून स्त्री-पुरुष यांच्यात मित्रत्वाच्या भूमिकेतून सुसंवाद साधणे महत्वाचं आहे. या कार्यशाळेत लिंग संवेदीकरण या संकल्पने सोबतच लिंगभूमिका, विशेषाधिकार, लिंग भेदभाव आणि लिंग जागरुकता अशा अनेक पैलूंवर सकारात्मक चर्चा झाल्याने, सदर कार्यशाळा महाविद्यालयीन विद्यार्थी-विदयार्थीनी, प्राध्यापक व संशोधकांसाठी अतिशय महत्वपूर्ण ठरली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. एस. एस.कोंडेकर , डॉ. एस. एच. कडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक व आभार समाजशास्त्र विभाग प्रमुख व कार्यशाळा समन्वयक डॉ. अनिल जायभाये यांनी मांडले तर सुत्रसंचालन प्रा. पंचशील डावकर यांनी केले. संकुलातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा यशस्वीरित्या संपन्न झाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE